वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाचे पृष्ठ

## -पोलीस शिपाई चालक भरती - २०२२ -२०२३

महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक ( सेवाप्रवेश ) नियम, २०१९ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा आणि दिनांक २७.०६.२०२२ दिनांक २३.०९.२०२२ अन्वये सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तरतुदींनुसार पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक यांची रिक्त असलेली ( १८ ) पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीव्दारे दिनांक ०५.०३.२०२४ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत स्विकारण्यात येतील. या बाबत सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल.ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरिता संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
- पोलीस शिपाई चालक या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यात येईल. सदर शारिरीक चाचणीत किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार संबधित प्रवर्गातील जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त जागांच्या १:१० याप्रमाणे उमेदवार लेखी परिक्षेसाठी पात्र ठरतील
- लेखी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना हलके मोटार वाहन चालवण्याची चाचणी २५ गुणांची व जीप प्रकारातील वाहन चालवण्याची चाचणी २५ गुणांची अशी एकूण ५० गुणांची कौशल्य चाचणी दयावी लागेल. सदर दोन्ही चांचण्यामध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवून उमेदवारास उत्तीर्ण व्हावे लागेल. कौशल्य चाचणी ही केवळ ही एक अर्हता चाचणी असून कौशल्य चाचणीत मिळालेले गुण गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकूण गुणात समाविष्ठ केले जाणार नाहीत. कौशल्य चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची १०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.
- सर्व पोलीस घटकामध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवूनच आवेदन अर्ज भरावा.
- शारीरीक चाचणी व लेखी चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ते नुसार तात्पुरती निवडसुची तयार करण्यात येईल. तात्परुत्या निवडसुचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवाराचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्रे पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवड सुचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसुचीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (PROVISIONAL SELECTION)असेल. शारिरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुंणाचे एकत्रिकरण केल्यानंतर गृहविभाग शासन निर्णय दिनांक १०.१२.२०२० नुसार अंतीम गुणवत्ता तयार करणेत येईल.

Scanned with OKEN Scanner

- पोलीस शिपाई चालक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारीरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे /कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. सदरहु जाहिरात उमेदवारांनी काळजीपुर्वक वाचुन, समजून घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरिता उपलब्ध पदांच्या १ % आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावून आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात ( Unreserved ) अर्ज करु शकतात, परंतु खुल्या प्रवर्गातील ( Unreserved ) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.

- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

( तुषार दोशी ) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे

Scanned with OKEN Scanner

पोलीस शिपाई चालक भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवाराने त्याबाबतची माहिती अॅन्टीकरप्शन ब्युरो, पुणे यांना दूरध्वनी क्रमांक ०२०-२५६३८४४६ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक यांचे कार्यालयातील वरिष्ठ अधिकार्‍यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती सन-२०२२-२०२३ तथा पोलीस अधीक्षक/अपर पोलीस अधीक्षक/ पोलीस उप-अधीक्षक, पुणे लोहमार्ग यांचेशी संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२८५५६१४ या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्प लाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था/ कार्यालयाचे नाव | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १. | पोलीस अधीक्षक लोहमार्ग कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक ( कार्यालयीन वेळेत ) | ०२०-२५५४१६३१ |

( तुषार दोशी ) भा.पो.से
पोलीस अधीक्षक,लोहमार्ग, पुणे

Scanned with OKEN Scanner

संकेतसस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात

# महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई चालक भरती सन २०२२-२०२३

## पोलीस अधीक्षक कार्यालय लोहमार्ग पुणे

जाहिरात क्रमांक -लोहमार्ग पुणे पो.भ./१/२०२२ लोहमार्ग दिनांक /०२/२०२४

महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई (सेवाप्रवेश ) नियम २०१९ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा आणि दिनांक २७/०६/२०२२ , दि. २३/०९/२०२२ च्या केलेल्या सुधारीत तरतुदीनुसार पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे यांच्या आस्थापनेवर सन २०२२-२०२३ मध्ये पोलीस शिपाई चालक संवर्गात रिक्त होणारी १८ पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे चालक पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे

### पोलीस शिपाई चालक १८

| | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इडब्ल्यूएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०४ | ०२ | ०२ | ०४ | १८ |
| कप्पीकृत ↓ आरक्षण | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०२ | ११ |
| महिला | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ |
| खेळाडू | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| प्रकल्पग्रस्त | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| भूकंपग्रस्त | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| माजीसैनिक | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०२ |
| अंशकालीन पदवीधर | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| पोलीस पाल्य | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| गृहरक्षक दल | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| एकूण | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०४ | ०२ | ०२ | ०४ | १८ |
| अनाथ | | महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक ०६.०४.२०२३ नुसार एकूण रिक्त पदे १८ चे अनाथासाठी निरंक पद रिक्त ठेवण्यात येत आहे. | | | | | | | | | | |

( तुषार दोशी ) भा.पो.से

पोलीस अधीक्षक,लोहमार्ग, पुणे

Scanned with OKEN Scanner